# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## ❖ नागरिकांना पूर्व परवानगीशिवाय मा. आयुक्तांना आठवडयातील प्रत्येक मंगळवारी व गुरूवारी दु. ३ ते सां. ५ वाजेपर्यंत भेटता येणार

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी नागरिकांना थेट भेटण्यासाठी नियोजित वेळेत सुधारणा केली असून, आता शहरातील सामान्य नागरिकांना आपल्या तक्रारी / निवेदन व समस्यांबाबत पूर्व परवानगीशिवाय मा. आयुक्त आठवडयातील प्रत्येक मंगळवारी व गुरूवारी दुपारी ३ ते सांयकाळी ५ वाजेपर्यत भेटता येईल असा निर्णय मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी घेतला आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका नागरिककेंद्रित प्रशासनावर ठाम विश्वास ठेवून कार्यरत आहे. नागरिकांच्या समस्या ऐकून घेणे, त्यांच्या तक्रारींचे त्वरित निवारण करणे आणि नागरिकाभिमुख प्रशासन अधिक सक्षम बनवणे या उद्देशाने, महानगरपालिका प्रशासनामार्फत सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. याआधी नागरिकांना मा. आयुक्तांना भेटण्यासाठी आठवड्यातील फक्त गुरुवार हा दिवस निश्चित करण्यात आला होता. त्या दिवशी दुपारी ३ ते सांयकाळी ५ या वेळेत नागरिकांना आपल्या तक्रारी अथवा सूचना मांडण्याची संधी मिळत होती. नागरिकांच्या सेवेसाठी मा. आयुक्त यांनी भेटण्याच्या वार व वेळेत सुधारणा करण्यात आली असुन दि. ०९ सप्टेंबर २०२५ पासून नागरिकांना आपल्या तक्रारी / निवेदन व समस्यांबाबत आठवड्यतील प्रत्येक मंगळवारी व गुरुवारी या दोन दिवशी दुपारी ३ ते सांयकाळी ५ या वेळेत मा. आयुक्तांना प्रत्यक्ष भेटता येईल.